MHGA040004562020

## न्यायालय विद्यमान दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर), आरमोरी, जिल्हा — गडचिरोली.

### नियमीत दिवाणी दावा क्र.१४/२०२०
### CNR-MHGA04-000456-2020

१. श्री. सुधाकर अर्जुन गोन्नाडे
वय— ६२ वर्षे, धंदा — सेवानिवृत्त,
२. श्री. दिलीप अर्जुन गोन्नाडे
वय— ५५ वर्षे, धंदा — नोकरी,
३. श्री. प्रज्वल सुभाष नंदनकर
वय— ३९ वर्षे, धंदा — नोकरी,
४. उज्वल सुभाष नंदनकर
वय— ३२ वर्षे, धंदा — नोकरी,
५. सौ. स्नेहल अमित पौनीकर
वय— ३५ वर्षे, धंदा — घरकाम,
वादी क्र.१,२ व ३ राह. नागपुर,
तालुका — जिल्हा — नागपुर.
वादी क्र.४ व ५ राह. पुणे,
तालुका — जिल्हा — पुणे. .... **वादी**

— वि रु द्ध —

१. श्री. अर्जुन कान्हू गोन्नाडे,
वय— ९० वर्षे, धंदा — सेवानिवृत्त,
२. श्री. संतोष अर्जुन गोन्नाडे,
वय— ५० वर्षे, धंदा — नोकरी,
३. श्री. जगन्नाथ कान्हू गोन्नाडे,
वय— ८५ वर्षे, धंदा — शेती,
४. सौ. सरस्वता पांडूरंग धकाते,
वय— ७५ वर्षे, धंदा — घरकाम,
प्रतिवादी क्र.१ व २ व राह. नागपुर,
तालुका — जिल्हा — नागपुर.
प्रतिवादी क्र.३ राह. आरमोरी,
तालुका — आरमोरी, जिल्हा — गडचिरोली.
प्रतिवादी क्र.४ राह. ब्रम्हपुरी,
तालुका — ब्रम्हपुरी, जिल्हा — चंद्रपुर. .... **प्रतिवादी**

**<u>नि.क्र. ३७ वरील आदेश</u>**

(पारीत दि.२३ फेब्रुवारी, २०२२ रोजी)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी वादपत्रात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याबाबत दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे थोडक्यात असे कथन आहे की, वादपत्राच्या मथळयामध्ये चुकीने ''बक्षीसपत्र व विक्रीपत्र रद्द होण्याकरीता व हिस्सेवाटणी करुन मिळण्याकरीता दावा'' असे लिहीण्यात आलेले आहे. वास्तविक, वादींनी सदर दावा हा प्रतिवादी क्र.१ याने प्रतिवादी क्र. २ यांना करुन दिलेले बक्षीसपत्र व विक्रीपत्र बेकायदेशिर व शुन्यवत असुन ते वादीवर बंधनकारक नाही असे घोषित होण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीने दाव्याच्या प्रार्थना परिच्छेदात तसे नमुद केले आहे. असे कथन करुन वादी यांनी वादपत्र दुरुस्त करण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली.

३. प्रतिवादी क्र.२ यांनी अर्जावर त्यांचे म्हणणे देवुन आक्षेप घेतलेला आहे. प्रतिवादी क्र.३ यांनी म्हणणे दिले नाही. प्रतिवादी क्र.२ यांचे थोडक्यात असे कथन आहे की, वादी यांनी दाखल केलेला दावा हा बक्षीसपत्र व विक्रीपत्र रद्द होण्याकरीता व हिस्सेवाटणी करुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे ही बाब वादी यांना ज्ञात होती. अर्जास संयुक्तीक कारण नाही. असे कथन करुन प्रतिवादी क्र.२ यांनी अर्ज खारीज करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी क्र.२ तर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. वादपत्रातील प्रार्थना परिच्छेदाचे अवलोकन केले असता अशी मागणी करण्यात आल्याचे दिसते की, प्रतिवादी क्र.१ नी प्रतिवादी क्र.२ ला करुन दिलेले रजिस्टर्ड विक्रीपत्र व बक्षीसपत्र बेकायदेशीर व शुन्यवत (null and void) असुन ते वादींवर बंधनकारक नाही. तसेच दाव्यातील शेतजमीन वादींच्या स्वतंत्र कब्जात देण्याची प्रतिवादीविरुध्द डिक्री देण्यात यावी या मागण्या केल्याचे दिसत आहे. वादी यांनी वादपत्राच्या शीर्षकामध्ये ''बक्षीसपत्र व विक्रीपत्र रद्द होण्याकरीता व हिस्सेवाटणी करुन मिळण्याकरीता दावा'' असा मजकुर लिहीलेला दिसत आहे. वादी हे वादपत्रातील मागणीप्रमाणे वादपत्राच्या शीर्षकात/मथळयात दुरुस्ती करु

इच्छितात. सदर दुरुस्ती केल्यामुळे दाव्याचे स्वरुपात काही बदल होणार नाही. अर्जास योग्य कारण आहे. वादपत्रात दुरुस्ती झाल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, वरील कारणांचा विचार करुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादपत्रात दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादीने पुढील तारखेपर्यंत वादपत्रात दुरुस्ती करावी.

४. पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by ravindra anandrao sawant
Date: 2022.02.24 11:39:16 +0530

आरमोरी
दि.२३.०२.२०२२

(आर.ए. सावंत)
दिवाणी न्यायाधिश(क.स्तर)
आरमोरी.